# प्रेसनोट

ला.प्र. विभाग, धुळे
दिनांक ०१.०९.२०२५

**लोकसेवक मनसीराम कोळशीराम चौरे, सहायक कृषी अधिकारी व रिजवान शेख, डाटा इन्ट्री ऑपरेटर, तालुका कृषी कार्यालय, साक्री यांनी तक्रारदार यांचेकडे १०,०००/— रुपये लाचेची मागणी करुन त्यापैकी ७,०००/— रुपये लाचेची रक्कम रिजवान शेख, डाटा ऑपरेटर यांनी स्विकारल्याने गुन्हा**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग** | धुळे |
| **पो. ठाणे, गुन्हा नोंद क्रमांक** | साक्री पो.स्टे. गुरनं. /२०२५ |
| **कलम व गुन्हा दाखल दिनांक** | भ्र.प्र. कायदा कलम ७ प्रमाणे, दि. ०१.०९.२०२५ |
| **आरोपीचे नांव, वय व कार्यालय** | ०१) मनसीराम कोळशीराम चौरे, वय ४५ वर्ष, सहायक कृषी अधिकारी, तालुका कृषी कार्यालय, साक्री, रा. व्दारा प्रविण अहिरे, जय मल्हार पापड उदयोग जवळ, कन्सरा कॉलनी, जेबापुर रोड, पिंपळनेर, ता. साक्री, जि.धुळे<br>०२) रिजवान रफिक शेख, वय २३ वर्षे, कंत्राटी डाटा ऑपरेटर, तालुका कृषी कार्यालय, साक्री, रा. पोळा चौक, साक्री, जि. धुळे |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | ७,०००/— रुपये |

**थोडक्यात हकिगत :—** तक्रारदार यांच्या नांवे मौजे पन्हाळीपाडा, ता. साक्री, जि. धुळे येथे शेतजमीन असुन सदर शेतजमिनीवर प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना व नमो शेतकरी महासन्मान निधी योजने अंतर्गत जमा झालेल्या अनुदानाच्या रकमेच्या मोबदल्यात आलोसे क्र. ०१ व ०२ यांनी तक्रारदार यांच्याकडे १०,०००/— रुपये लाचेची मागणी केल्याची तक्रारदार यांनी दि.०१.०९.२०२५ रोजी दुरध्वनीव्दारे माहिती दिली होती.

सदर माहितीवरुन पोलीस निरीक्षक श्रीमती पद्मावती कलाल यांनी साक्री येथे जावुन तक्रारदार यांची भेट घेवुन तक्रार नोंदवुन घेवुन सदर तक्रारीची पंचांसमक्ष पडताळणी केली असता आलोसे क्र. ०१ व ०२ यांनी तक्रारदार यांच्याकडे १०,०००/— रुपये लाचेची मागणी केली होती.

त्यानंतर सापळा कारवाई दरम्यान आलोसे क्र. ०१ व ०२ यांनी तक्रारदार यांचेशी चर्चा करुन मागणी केलेल्या लाचेच्या रकमेपैकी ७,०००/— रुपये लाचेची रक्कम आलोसे क्र. ०२ यांनी तक्रारदार यांचेकडुन स्वत: स्विकारली असता आलोसे क्र. ०१ व ०२ यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

| | |
|---|---|
| **सापळा पर्यवेक्षण अधिकारी** | सचिन साळुंखे, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि. धुळे |
| **सापळा अधिकारी** | श्रीमती पद्मावती कलाल, पोलीस निरीक्षक |
| **सापळा पथक** | यशवंत बोरसे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. धुळे<br>पोहेकॉ. राजन कदम, मुकेश अहिरे, प्रविण मोरे, संतोष पावरा, पोकॉ. मकरंद पाटील, रामदास बारेला, प्रविण पाटील, सागर शिर्के, प्रितेश चौधरी, रेश्मा परदेशी, पोहेकॉ. सुधीर मोरे, जगदीश बडगुजर, ला.प्र.वि. धुळे |
| **मार्गदर्शन** | १) मा. श्री भारत तांगडे, पोलीस अधीक्षक<br>२) मा. श्री. माधव रेडडी, अपर पोलीस अधीक्षक<br>३) मा. श्री. सुनिल दोरगे, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक |

पोलीस उप अधिक्षक, ॲन्टी करप्शन, धुळे

**लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकिय/ निम शासकिय अधिकारी / कर्मचारी अथवा खाजगी पंटर यांनी काम करुन देण्यास लाचेची मागणी केल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे येथे संपर्क साधावा.**

**संपर्क पत्ता** :— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे
**संकेतस्थळ** :— acbmaharashtra.gov.in
**ईमेल** :— dyspacbdhule@gmail.com
**टोलफ्री क्रमांक** :— १०६४
**दुरध्वनी क्रमांक** :— ०२५६२—२३४०२०

**(सचिन साळुंखे)**
**पोलीस उपअधीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे.**